सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ✆ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ✆ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**ई-मेल** - sec.mpsc@maharashtra.gov.in **वेबसाईट** - www.mpsc.gov.in , https://mahampsc.mahaonline.gov.in

## लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा, २०१४

**जाहिरात क्रमांक : १४९/२०१४** **क्रमांक १४४२/२०३६३/२०१४/बारा**

राज्य शासनाच्या मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व बृहन्मुंबईतील विविध कार्यालयातील **लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) गट-क** , या संवर्गातील पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे **रविवार दिनांक २७ जुलै ,२०१४** रोजी **लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा, २०१४** मुंबईसह महाराष्ट्रातील **३५ जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील उपलब्ध पदसंख्या :- ४४८ पदे**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
| ( १) | (२) | (३) | ( ४) | ( ५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | लिपिक-टंकलेखक (मराठी) चालू रिक्त पदे - ३२८ + अनुशेषाची पदे - ८० (एकूण पदे - ४०८) | १६८ | ६४ | ३४ | १३ | १५ | -- | २१ | १३ | ८०▼ |
| | महिला | ५० | १९ | १० | ४ | ५ | -- | ६ | ४ | -- |
| | माजी सैनिक | २४ | १० | ५ | २ | २ | -- | ३ | २ | -- |
| | खेळाडू | ८ | ३ | २ | -- | १ | -- | १ | -- | -- |
| | अपंग -(एकूण ६ पदे ) | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - २ पद , चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अधार्गवायु - २ पदे , श्रवण शक्तीतील दोष - २ पदे | | | | | | | | |

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
| ( १) | (२) | (३) | ( ४) | ( ५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| २ | लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) चालू रिक्त पदे- ३२ + अनुशेषाची पदे- ०८ (एकूण पदे- ४०) | १७ | ६ | ३ | १ | २ | -- | २ | १ | ८▼ |
| | महिला | ५ | २ | १ | -- | १ | -- | १ | -- | -- |
| | माजी सैनिक | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग -( एकूण ३ पदे) | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - १ पद , चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अधार्गवायु - १ पद, श्रवण शक्तीतील दोष - १ पद | | | | | | | | |

**▼ अशी खूण केलेली पदे अनुशेषाची आहेत.**

३. बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील उपलब्द पदसंख्या :- ८५२ पदे

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
| ( १) | (२) | (३) | ( ४) | ( ५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | लिपिक-टंकलेखक (मराठी) चालू रिक्त (एकूण पदे- ७८२) | ४०३ | ८३ | ४२ | १४ | १८ | ६ | ३३ | २० | १६३ |
| | महिला | १२१ | २५ | १३ | ४ | ५ | २ | १० | ६ | ४९ |
| | माजी सैनिक | ६० | १२ | ६ | २ | ३ | १ | ५ | ३ | २४ |
| | खेळाडू | २० | ४ | २ | १ | १ | -- | २ | १ | ८ |
| | अपंग-(एकूण १५ पदे) | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - ६ पदे , चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अधार्गवायुव- १ पद , श्रवण शक्तीतील दोष - ८ पदे | | | | | | | | |

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि. जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
| ( १) | (२) | (३) | ( ४) | ( ५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| २ | **लिपिक-टंकलेखक (इंग्रजी ) चालू रिक्त (एकूण पदे - ७०)** | ४४ | ९ | २ | ४ | ३ | -- | १ | -- | ७ |
| | **महिला** | १३ | ३ | १ | १ | १ | -- | - - | -- | २ |
| | **माजी सैनिक** | ७ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | १ |
| | **खेळाडू** | २ | | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | **अपंग-(एकूण - १ पद)** | **अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - १ पद** | | | | | | | | |

टिप:- १) **प्रस्तुत परीक्षेमधून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. मलोआ-२००७/प्र. क्र. १६७/०७/१४-अ दिनांक २० फेब्रुवारी, २००८ व दिनांक ९ एप्रिल, २०१२ मधील तरतुदीनुसार प्रत्येक प्रवर्गातील उच्चतम गुणवत्तेच्या उमेदवारांची शिफारस मंत्रालयीन विभागांसाठी करून उर्वरित निम्न गुणवत्तेच्या उमेदवारांची शिफारस बृहन्मुंबईतील इतर शासकीय कार्यालयासाठी करण्यात येईल.**

२) **प्रस्तुत पदाच्या जाहिरातीमधील उपलब्ध पदसंख्या या रकान्याच्या पुढे "उन्नत व प्रगत गटात न मोडणारे" हे वाक्य विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास वर्ग व अमागास (महिला) इ. वर्गवारीत मोडणा-या उमेदवारांनी उत्पन्नाच्या आधारे समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अनुषंगाने नमूद करण्यात आलेले आहे. याबाबतची माहिती आयोगाच्या उपरोक्त वेबसाईटवरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना " मधील सूचना क्र. ४.१.१५ व ४.१.१६ मध्ये देण्यात आलेली आहे. सदर माहिती बाबतची संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.**

२.१ वर नमूद केलेल्या मंत्रालयीन प्रशासकिय विभागाच्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ महिला व खेळाडूं व माजी सैनिकासाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण चालू रिक्त पदसंख्येपैकी असतील.

२.३ महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र.८२/२००१/म.से.आ. २०००/प्र. क्र. ४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.४ खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल. **खेळाडू वर्गवारीसाठी दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे, संचालक, क्रिडा व युवक संचालनालय यांच्याकडून प्रमाणित करुन ठेवावीत.**

२.५ अपंग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल. अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.६ अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर स्पर्धा परीक्षेद्वारे शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

२.७ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. **तथापि, त्यांनी तसे अर्जामध्ये नमूद करणे अनिवार्य आहे.**

**३. वेतनश्रेणी :-** रूपये ५२००-२०२०० (ग्रेड पे- रू. १९००/-) अधिक नियमानुसार भत्ते.

**४. पात्रतेच्या अटी :-**

४.१. भारतीय नागरिकत्व.

४.२ वयोमर्यादा :- **दिनांक १ सप्टेंबर, २०१४** रोजी किमान **१८** वर्षे असावे व **३३** वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.३. उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

४.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत **५** वर्षांपर्यंत.

४.३.२ अपंग उमेदवारांच्या बाबतीत **४५** वर्षांपर्यंत.

४.३.३. पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

४.३.४ माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शासन शुध्दीपत्रक क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५ शैक्षणिक अर्हता :-**

५.१ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S. S. C.) उत्तीर्ण अथवा तत्सम अर्हता

५.२ लिपिक-टंकलेखक (मराठी ) पदासाठी मराठी टंकलेखनाचा वेग **३०** शब्द प्रति मिनिट व लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) पदासाठी इंग्रजी टंकलेखनाचा वेग **४०** शब्द प्रति मिनिट सदर वेगाबाबत शासकीय परीक्षा मंडळाची परीक्षा अर्ज सादर करण्याच्या विहित अंतिम दिनांकास म्हणजेच **दिनांक २० जून, २०१४** किंवा तत्पूर्वी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५.३. लिपिक - टंकलेखक (इंग्रजी) या पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांना म. ना. से. (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखक/मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली १९९१ मधील नियम-३ व ४नुसार, एतदर्थ मंडळाची मराठी टंकलेखनाची प्रती मिनिट ३० शब्द गतीची परीक्षा, शासन सेवेत प्रविष्ठ झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल. व प्रथम भाषा म्हणून मराठी (उच्चस्तर) विषय न घेता माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेल्या इंग्रजी लिपिक - टंकलेखकांनी ६ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल.

५.४ माजी सैनिक असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत सदर उमेदवाराने प्रस्तुत पदाच्या सेवाप्रवेश नियमातील नियम ३ (ब) (iii) मध्ये विहित केलेले टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल, तर त्याने शासकिय वाणिज्य संस्थेचे विहित वेगाच्या टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र त्याच्या शासन सेवेतील नियुक्तीच्या दिनांकापासून ११ महिन्यात सादर करणे आवश्यक राहिल.

५.५ संगणकाच्या ज्ञानासंदर्भात शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९/३/२००३ व माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) दिनांक ४/२/२०१३ नुसार अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

५.६ हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**६.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्विकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या विभागातील " **लिपिक-टंकलेखक परीक्षा** " मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**७ शुल्क** : ७.१ अमागास - **३६५/-** ७.२ मागासवर्गीय - **२६५/-** ७.३ माजी सैनिक - **१५/-**

**८ अर्ज करण्याची पद्धत :-**

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड **(Web-based)** ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ३१ मे, २०१४ ते २० जून, २०१४** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहिल.

८.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

८.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

८.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलना व्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

८.६ https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलब्ध आहे.

८.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील माझे खाते या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ' **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) " **Pay Now** " या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(८) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर - उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता माझे खाते मधील आवश्यक पदाची निवड करावी. त्यानंतर केंद्र निवडा या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. जर केंद्राच्या क्षमते इतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल

(९) जे उमेदवार भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्काचा भरणा करतील, असे उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडिची प्रक्रिया करु शकतील. जर हा दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

८.८ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**९.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१०. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २० जून, २०१४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**११. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २१ जून, २०१४ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**१२.** लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : **३१ मे, २०१४**

**श्री. शं. पाठक**
उप सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**